राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : के.आर.८१३/२०२५

अपीलकर्ता, श्री.राजेश चुहरमल नागदेव,
बॅरेक नं.१६७९, रुम नं.०५, सेक्शन २५,
उल्हासनगर जि.ठाणे ४२१ ००४.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप कर निर्धारक व संकलक,
मालमत्ता कर विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर, मुख्यालय, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कर निर्धारक व संकलक,
मालमत्ता कर विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर, मुख्यालय, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.

द्वितीय अपील सुनावणीचा दिनांक : १/७/२०२६

माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक	जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
११/११/२०२४	----	१६/१२/२०२४	१७/१/२०२५

अपीलकर्ता यांनी दि.२८/२/२०२५ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपीलावर आज दिनांक १/७/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.भानु परमार, प्र.कर निरीक्षक, मालमत्ता कर विभाग, उल्हासनगर मनपा उपस्थित आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सचिन वानखडे, सध्या कार्यरत-उप कर निर्धारक व संकलक, मालमत्ता कर विभाग, उल्हासनगर मनपा व विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.विनोद केणे, कर निर्धारक व संकलक, मालमत्ता कर विभाग, उल्हासनगर मनपा आणि तत्कालिन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्रीमती निलम कदम, कर निर्धारक व संकलक, मालमत्ता कर विभाग, उल्हासनगर मनपा अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

अपीलकर्ता यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" सेंच्युरी रेयॉन कंपनी शहाड स्टेशन जवळ, कल्याण मुरबाड रोड, उल्हासनगर १ या कंपनीच्या कर रक्कमेची खुलासा माहिती मिळणेबाबत. जानेवारी २०१९ पासून माहितीच्या दिनाकापर्यंत.
१.सेंच्युरी रेयॉन कंपनी उ.म.पा. कर बिल नं.५५०३७९ बिल दिनांक : २५/०४/२०२४ मालमत्ता क्र.९९डीआय०१७४१७८०० जुना मालमत्ता क्र.९९/०००५ बिलाची रक्कम-११८०१९५७०/- (अक्षरी अकरा कोटी ऐंशी लाख एकोनावीस हजार पाचशे सत्तर रू.) बिल इश्यु करणारे अधिकारी श्रीम.निलम कदम, कर निर्धारक व संकलक उ.म.पा. सदर कराची रक्कम भरणा झाली अथवा कसे याबाबतची माहिती. तसेच सदर बिलाची साक्षांकित प्रत व भरणा केलेल्या रक्कमेचा बँक स्टेटमेंटसह तपशिल.
२. सेंच्युरी रेयॉन कंपनी उ.म.पा. कर बिल नं.५६२७०२ बिल दिनांक : ०२/०८/२०२४ मालमत्ता क्र.९९डीआय०१७४१७८०० जुना मालमत्ता क्र.९९/०००५ बिलाची रक्कम-२६४९४०५८/- (अक्षरी दोन कोटी चौरसष्ठ लाख चौऱ्यान्नव हजार अठ्ठावन रू.) बिल इश्यु करणारे अधिकारी श्रीम.निलम कदम, कर निर्धारक व संकलक उ.म.पा. सदर कराची रक्कम भरणा दि.०५/०८/२०२४ रिसीप्ट नं.२२०५०४ झाली अथवा कसे याबाबतची माहिती. तसेच सदर बिलाची साक्षांकित प्रत व भरणा केलेल्या रक्कमेचा बँक स्टेटमेंटसह तपशिल.

३.सदरहु वर्णणीत बिलाची रक्कम-११८०१९५७०/- अक्षरी अकरा कोटी ऐंशी लाख एकोनावीस हजार पाचशे सत्तर रू. बिलावरून बिलाची रक्कम २६४९४०५८/- दोन कोटी चौस्सठ्ठ लाख चौऱ्यान्नव हजार अठ्ठावन रू. मात्र झाल्याबाबतचा खुलासा प्राप्त व्हावा. सदर रक्कम रू.९१५२५५१२/- नउ कोटी पंधरा लाख पंचवीस हजार पाचशे बारा हे ज्या योजनेअंतर्गत माफी मिळाली त्याबाबतचा खुलासा तसेच परिपत्रक/जीआर कार्यालयीन पत्र प्राप्त व्हावे."

अपीलकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे. केवळ मुद्दा क्र.२ ची माहिती प्राप्त झालेली असून मुद्दा क्र.१ व ३ ची माहिती प्राप्त झालेली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपीलकर्ता यांना मुद्दा क्र.१ व ३ ची माहिती २४ तासात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना २४ तासात द्यावे. तसा अहवाल आयोगास पुढील सुनावणीस सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.६/७/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १ जुलै २०२६ .

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.भानु परमार,
प्र.कर निरीक्षक, मालमत्ता कर विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्यालय,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.